MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

परळी मतदारसंघांमध्ये बहिण भाऊ एकत्र आल्यामुळे मोठी राजकीय बदल झालेली आहेत राजकीय बदल होत असताना २०२४ च्या भाजपाचे उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मोठा मताधिक्य परळी मतदारसंघातून मिळालेला असतानाच यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पुढील उमेदवार म्हणून बबन गीते हे असू शकतात तर यावेळी मात्र फुलचंद कराड व टीपी मुंडे हे ओबीसी नेते असल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये मात्र मराठा समाजाच्या विरोधात जरांगे वर्सेस हाके असा संघर्ष यावेळी महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत असतानाच मात्र धनंजय मुंडे यांची आज मतदारसंघावरती मोठी पकड असताना बहिण भावांची ताकद धनंजय मुंडे यांना विजयाच्या वाटचालीकडे घेऊन जात आहे परंतु जर राजकीय तडजोडीमध्ये जर बहिण भावाचे कार्यकर्ते कुठले तर धनंजय मुंडे यांना ओबीसी मधून मतदानाचा फटका मिळू शकतो तर यावेळी धनंजय मुंडे यांचे विरोधात बबन गीते




हे सुद्धा ओबीसी मधूनच आहेत आणि मराठा समाजाने साथ दिली तर बजरंग सोनवणे सारखा माणूस संदीप क्षीरसागर यांच्यासारखा माणूस जर त्या मतदारसंघात फिरला तर नक्कीच मराठा समाज ओबीसी बबन गीते आमदार केल्याशिवाय राहणार नाही तर धनंजय मुंडे यांची आमदारकी ही धोक्यात असल्याने मराठा समाजाचे मतदान वळविण्यामध्ये धनंजय मुंडे पंकजाताई मुंडे यांना किती यश येते याकडे पाहिले जात असतानाच मात्र याच राजकीय कारकीर्दीमध्ये सध्याच्या परिस्थितीत पाहतात धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांची सध्याच्या महाराष्ट्रातील राजकीय वाटचालीतील भूमिका व बोलणं वागणं हे खूप मोठ्या प्रमाणात बदललेलं दिसून येत आहे बहिण भावांच्या आक्रमक भूमिकेमुळे धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांना परळी मतदारसंघात मराठा समाजाचे म्हणून परिवर्तन करून आपल्या पदरात मत पाडून घेण्यासाठी खूप मोठी कसरत करावी लागणार आहे परंतु बबन गीते जर उमेदवार राहिले तर यावेळी धनंजय मुंडे यांचे आमदारकी मराठा समाजामुळे धोक्यात असल्याची चर्चा आहे म्हणून यांनी ओबीसी मराठा वाद बाजूला ठेवून सर्वांना एकत्र घेणे काळाची गरज आहे.



बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –२७१ सोमवार दि.२४ जुन २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -271 MONDAY DT. 24 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# क्षीरसागर,धस,आजबे,सोळंके,पवार पंडित, आडसकर, जगताप,यांना बहिण भाऊ डिच्चू देण्याच्या तयारीत?

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आ. सुरेश धस, सोळंके, आजबे, पंडित, पवार ओबीसी, मराठा वाद, आणि पंकजाताई धनु भाऊ याच्या सध्याच्या राजकीय वागणुकीत बोलण्यात मोठा बदल

- सहा मतदार संघात नवीन चेहऱ्यांना संधी. राजकीय रणरीती आखली ?
- मनोज जरांगे पाटील यांनी मराठा चेहेरा दिला तर पंकजाताई धनु भाऊ देणार ओबीसी
- तर भविष्यात डॉक्टर योगेश शिरसागर हे पंकजाताई मुंडे धनंजय मुंडे यांच्या जवळ एकमेव सर्वांचे विरोधात जाऊन पंकजाताई मुंडे धनंजय मुंडे यांना साथ देतील?
- पंकजाताई धनु भाऊ बहिण भाऊ यावेळी बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघांमध्ये ओबीसी उमेदवार हे असू शकतात
- बीडमधून डॉ योगेश क्षीरसागर, माजलगाव मधून माधव निर्मळ, बाबरी मुंडे, केज मधून माजी संगीता ठोंबरे, आ. नमिता मुंदडा, आष्टी पाटोदा शिरूर मधून भीमराव धोंडे ना तर गेवराई मधून नवीन चेहऱ्याला संधी.?
- तर जयदत्त क्षीरसागर सहा मतदारसंघांमध्ये प्रभावशील नेतृत्व मोठा दबाव गटाची तयारी?
- महायुतीच्या उमेदवारांनी पंकजाताई मुंडे यांचा प्रचार करत असताना आपापल्या कार्यकर्त्याला अंधारातून तुतारी वाजविण्याचे सांगितले होते याचा परिणाम आता सहाही मतदारसंघातील दिग्गज नेत्यांना भावना आहे कारण बहिण भाऊ हे एकत्र आल्यामुळे अनेकांच्या पोटात गोळा उठला आहे. परंतु याचा मराठा ओबीसी वाद पेटला असतानाच पंकजाताई व धनंजय मुंडे हे हे एकत्र आल्यामुळे बीड जिल्ह्याचे समीकरणे बदलले आहेत यावेळी नक्कीच पुढील मोठा गट पंकजाताई धनंजय मुंडे पासून वेगळा होणार असल्याने यावेळी मात्र माझी पालकमंत्री व ज्येष्ठ नेते ओबीसी चे नेते समजले जाणारे व सर्व पक्षांना हवे हवेचे आटणारे बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्यासोबत सुरेश धस लक्ष्मण पवार अमरसिंह पंडित प्रकाश सोळंके मोहन जगताप रमेश आडसकर नमिता मुंदडा बबन गीते, संगीता ठोंबरे, बाळासाहेब आजबे हे एकत्रित येऊन मोठा गट तयार करून पंकजाताई मुंडे धनंजय मुंडे यांच्या विरोधात बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये बहिण भावावर दबाव तंत्र वापरून पुढील नेतृत्व हे जयदत्त क्षीरसागर अमरसिंह पंडित सुरेश धस लक्ष्मण पवार प्रकाश सोळंके हे करतील व बहिण–भावाला बाजूला सारून बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघांमध्ये आपलं वर्चस्व कायम ठेवतील असंही या मराठा ओबीसी वादामध्ये होऊ शकतं अशी चर्चा बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे?

बीड /प्रतिनिधी

सध्याची राजकीय परिस्थिती पाहता बीड लोकसभा मतदारसंघात २०२४ मध्ये बीड जिल्ह्यात उमेदवाराला प्रचंड जातिवादाला सामोरे जावे लागले. यावेळी जनतेने निवडणूक हातात घेत बजरंग सोनवणेला निवडणुकीच्या रिंगणामध्ये शरद पवार गटाने उतरवत बीड जिल्ह्यामध्ये बजरंग सोनवणे २०२४ लोकसभेची निवडणूक बीडवर राष्ट्रवादीने आपला झेंडा कायम राखण्यात यश मिळवलं यावेळी राष्ट्रवादीचा झेंडा सांभाळण्यासाठी एकमेव बीडचे आमदार संदीप क्षीरसागर हीच खंबीर नेतृत्व म्हणून बीड जिल्हा मध्ये फिरत होते. पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे हे २०२४ लोकसभेच्या पराभवानंतर बीड जिल्ह्याच्या राजकीय परिस्थितीमध्ये महाराष्ट्रामध्ये आक्रमक परिस्थिती पाहता पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांची वागणूक व बोलीभाषा ही आक्रमकपणे दिसून येत आहेत यामध्ये मराठा समाजाला विरोधात काम करण्यासाठी पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांनी येणाऱ्या २०२४ विधानसभा निवडणुकीमध्ये असतानाच राजकीय योजना असताना बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये पाच हे महायुतीचे उमेदवार सध्या आहेत यामध्ये माजलगाव मतदारसंघातून प्रकाश सोळंकेज मतदार संघातून नमिता मुंदडा परळी मतदारसंघातून धनंजय मुंडे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून बाळासाहेब आजबे गेवराई मतदार संघातून लक्ष्मण पवार तर बीडमधून शरद पवार गटाची राष्ट्रवादीचे आमदार संदीप क्षीरसागर हे विद्यमान आमदार आहेत परंतु या सर्वच आमदारांनी पंकजाताई मुंडे यांच्या विरोधामध्ये अंधारातून काम केले की चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सध्याच्या परिस्थितीमध्ये पाहता विकास मिळत आहे मराठा समाजाच्या याच पाच मतदारसंघातून म्हणजेच आष्टी पाटोदा शिरूर गेवराई माजलगाव परळी या मतदारसंघातून मराठा समाजाच्या भाजपच्या राष्ट्रवादीच्या महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी पंकजाताई मुंडे यांना अंधारातून विरोध करून पाडण्याची चर्चा व मनस्ताप पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांना सहन करावा लागला आहे बहीण भाऊ एकत्र जर आले तर आपलं काही खरं नाही म्हणून पंकजाताईंना पाडण्याची चर्चा ग्रामीण भागामध्ये आहे पंकजा मुंडे व धनंजय मुंडे या पाच–सहा मतदारसंघांमध्ये नवीन उमेदवाराला संधी देऊन जुन्यांना घरी बसविण्याच्या तयारीमध्ये असल्याची सध्या महाराष्ट्रामध्ये चर्चा चालू आहे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे लवकरच बदलणार.

### आष्टी

आ. धस आजबे यांची धकधक वाढली तर भीमराव धोंडे यांना पंकजाताई धनंजय मुंडे निवडणुकीच्या रिंगणामध्ये सर्व ताकतीनशे उतरू यावेळी ओबीसीचा उमेदवार म्हणून भीमराव धोंडे यांना निवडणुकीत निवडून आणण्याची तयारी दर्शवली आहे आत्ताच त्याची सर्व तयारी चालू झाली आहे आमदार सुरेश धस व आमदार बाळासाहेब आजबे यांनी व मराठा समाजांनी पंकजाताई मुंडे यांच्या विरोधामध्ये अंधारातून काम करून पक्षाच्या विरोधामध्ये काम केले व धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात काम करून पंकजाताई मुंडे यांना पाडण्याचं काम केलं आहे ओबीसीचे नेते मतदारसंघातून अनेकदा नेतृत्व केलेले भीमराव धोंडे यांना धनंजय मुंडे पंकजाताई मुंडे हा ओबीसी समाज आष्टी पाटोद्यातील भीमराव धोंड्याच्या पाठीशी उभा करून





आमदार सुरेश धस व बाळासाहेब आजबे यांना घरी बसविण्याची तयारी बहीण भावांनी केली आहे म्हणून आमदार धोंडे व आजबे यांची धाकधूक वाढली असल्याने आष्टी पाटोदा येथील मतदार संघातील मराठा ओबीसी वाद आणखी जाळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये ऐकायला मिळत आहे परंतु मराठा समाजाने म्हणजेच बाळासाहेब आजबे सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांनी अंधारातून बजरंग सोनालीला मदत केली ही कोणाच्या इशारावर गेली हे धनंजय मुंडे यांना उत्तर देण्यासाठी धस व आजबे यांच्याकडे उत्तर नाही म्हणून आष्टी पाटोद्यामध्ये भीमराव धोंडे यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे पंकजाताई मुंडे यांच्या राजकीय वागणुकीत व बोलण्यामध्ये बीड जिल्ह्यातील आष्टी पाटोदा शिरूर मध्ये बदल घडणार हे मात्र निश्चित आहे आणि जरांगी वर्सेस हाके संघर्षाला आता जे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहणार आहे.

गेवराई मतदार संघात आतापर्यंत पंडित पवार यांच्याकडेच आमदारकी राहिलेली आहे दोन्ही पंडित आणि एक पवार आणि आता दोघात तिसरा आणि आता सगळं विसरा अशी एकेकाळी गेवराई मतदार संघात झाली होती तेव्हा आमदार लक्ष्मण पवार यांना गेवराई मतदार संघातील जनतेने स्थान दिले होते परंतु आत्ताच्या ओबीसी मराठा वादात म्हणजेच जरांगे होके यांच्या वादामध्ये राजकीय विश्लेषण बदललेले आहे बीड लोकसभेमध्ये बजरंग सोनवणे यांना मोठी लीड दिली आहे गेवराई मध्ये खूप मोठा जातिवाद झाल्याची चर्चा आहे यामध्ये बीड जिल्ह्यातील जातीवादी तिकडे आणि गेवराई तालुक्यातील सर्वात जास्त जातीवादी हिकीकडे होता तर यावेळी राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार आमचे पंडित व




विद्यमान आमदार लक्ष्मणांना लक्ष्मण पवार हे दोघं असताना सुद्धा गेवराई मधून कशी काय शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार बाजीराव सोनवणे यांना लीड मिळते याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे कारण यावेळी अमरचे पंडित व लक्ष्मण पवार यांनी अंधारातून कार्यकर्त्यांना तुतारी वाजविण्याचे आदेश दिल्याची चर्चा गेवराई मतदार संघामध्ये ऐकायला मिळत आहे याचाच राग आता पंकजा मुंडे व धनंजय मुंडे बहिण भाऊ हे दोघेजण आता मतदारसंघांमध्ये काढणार आहेत या मतदारसंघांमध्ये आता माजी मंत्री व उद्धव ठाकरे गटाचे शिवसेनेचे नेते जड झाले असतानाच यानंतरचा आमदार हा बदामराव पंडित किंवा नवीन चेहराही असू शकतो अशी चर्चा सध्या बीड जिल्ह्यातील गेवराई मतदार संघामध्ये ऐकायला मिळत आहे परंतु याच वेळी ओबीसी मराठा वादामध्ये जर मनोज रंगींनी मराठा चेहरा दिला तर गेवराई मध्ये धनु भाऊ व पंकजाताई दोघे बहिण भाऊ मिळून एक नवीन ओबीसी चेहरा त्या ठिकाणी येऊन नवीन आमदार निवडून आनंद बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी देणार आहेत कारण यामध्ये पंडित पवार संघर्षामध्ये आता रोगात तिसरा आणि आता सगळे विसरा अशी गत यावेळी होणार आहे परंतु यावेळी गेवराई मतदार संघातून पंडित पवार यांनी पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे एकत्र आल्यामुळे बहीण भावांच्या विरोधामध्ये वाजवण्याची चर्चा आहे गेवराई मतदार संघामध्ये भाजपच्या वरिष्ठांकडून पंकजाताईंचे विरोधात काम करा असाही आदेश आले याची चर्चा आहे तर अजित दादा पवार गटाचे अमरसिंह पंडित हे त्यांचे बंधू विजयसिंह पंडित यांना आमदार करण्यासाठी आज प्रयत्नशील असताना सध्याचे आमदारकीमध्ये भावी आमदार म्हणून नेमकं कोणाला आयुष्यभर मिळवावा लागेल हे मात्र सांगू शकत नाहीत.



### केज अंबाजोगाई

केज मतदार संघामध्ये नवीनताई मुंडे ह्या स्वर्गीय विमलताई मुंडे यांच्या सुनबाई आहेत यावेळी अक्षय भैया मुंदडा व त्यांचे सासरे नंदकिशोर मंडळ आहे पंकजाताई यांच्या इमान ईद बरे काम करून पंकजाताईंना मतदान देण्यामध्ये झालेले आहेत परंतु त्या ठिकाणाहून बजरंग सोनवणे यांना १३००० ची लीड त्या मतदारसंघातून मिळालेली आहे म्हणून त्या मतदारसंघांमध्ये नवीन चेहऱ्याला संधी मिळेल का नाही काय माहित नाही परंतु यावेळी पंकजाताई मुंडे यांनी नमिता अक्षय मुंदडा यांच्यासाठी जर कंबर कसली तर त्या ठिकाणी नक्कीच नमितताई मुंडे यांचा विजय होईल परंतु भाजपाच्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गटाचे पुढील उमेदवार म्हणून माझी आमदार पृथ्वीराज साठे यांनाही संधी मिळू शकते परंतु येणाऱ्या काळामध्ये केस मतदार संघामध्ये ही पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे या मनोज जरांगे पाटील व हाके यांच्या मराठा ओबीसी वादाचा नेमका फायदा मातंग समाजाचे म्हणून कृतीला साठे तर चर्मकार समाजाच्या संगीता ताई ठोंबरे व नमित्ताई मुंदडा यांना फायदा होऊ शकतो का किंवा नमित्ताने यांना धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या वरती असलेल्या मराठ्यांच्या रोशाला सामोरे जाऊन त्यांनाही पराभवाचा सामना करावा लागू शकतो.

बीड मतदार संघात

बीड मतदार संघामध्ये लोकप्रिय आमदार म्हणून सध्याच्या परिस्थितीमध्ये राजकीय परिस्थितीत जयदत्त क्षीरसागर यांना पसंती मिळत आहे यांच्या राजकीय कारकीर्दीमध्ये यशस्वी पालकमंत्री म्हणून जयदत्त क्षीरसागर यांना बीड जिल्ह्याने पसंती दिलेली आहे परंतु यावेळी बीड जिल्ह्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच संदीप क्षीरसागर यांना आमदारकी मिळाली वेदना शिरसागर यांना यांचा पराभव केला संदीप क्षीरसागर आमदार झाले खरे परंतु यावेळी अण्णा क्षीरसागर यांची लोकप्रियता





वाढलेली असतानाच यावेळी मात्र भाजपचे भावी आमदार म्हणून राजेंद्र मस्के यांना असं वाटत होतं की मीच आता पुढील आमदार आहे भाजपचा तिकीट मलाच आहे परंतु मराठा ओबीसी वादामध्ये आता राजेंद्र मस्के भाजपचे जिल्हाध्यक्ष असताना स्वतःच्या गावातून राजेंद्र मस्केला कसल्याही प्रकारची मदत गावकऱ्यांनी केलेली दिसून येत नाही म्हणून राजेंद्र मस्के यांनी आता आमदारकी विसरलेलेच बरे त्या राजेंद्र मस्के हे भावी आमदार चारियस मधून बाहेर पडलेले चित्र स्पष्ट झाले असतानाच यावेळी मात्र ओबीसी चे नेते व मराठा समाजाला साथ देणारे व २०२४ लोकसभा निवडणुकीमध्ये तटस्थ राहून आपली राजकीय कुरबडी यशस्वी करण्यामध्ये जयदत्त क्षीरसागर हे यशस्वी झालेले आहेत जगतांना क्षीरसागर यांच्यामुळे बजरंग सोनवणे हे निवडून आलेले असतात याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सध्या मोठ्या आवाजात ऐकायला मिळत आहे पंकजाताई मुंडे यांना जर जयदत्त क्षीरसागर यांनी मदत केली असती तर नक्कीच ते बीडच्या खासदार झाल्या असत्या परंतु देतांना यांनी बीडच्या बजरंग सोनवणे यांची तुतारी अंधारातून वाजवण्याची कार्यकर्त्यांना सांगितल्यामुळे पंकजाताई मुंडे या पडल्या व आता धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे हे जगताना यांना आम्ही येणारे विधानसभेमध्ये पाडू यावेळी बोलत आहेत परंतु यावेळी धनंजय मुंडे पंकजाताई मुंडे पाडू शकत नाहीत कारण मराठा समाज ओबीसी समाज हा जगांना सोबत असताना यावेळी मात्र योगेश क्षीरसागर यांना विधानसभेमध्ये उतरण्याची तयारी धनंजय मुंडे पंकजा मुंडे यांनी केली असताना यावेळी योगेश क्षीरसागर यांची आणखी राजकीय वाटचाल ही खूप डगमळीची असल्याची चर्चा बीड शहरातच ऐकायला मिळत आहे त्यांना बीड शहरातील अगोदर नगरपरिषदेचे आलेले निवडणुकीमध्ये सामोरे जात जनतेसमोर जावे लागेल परंतु योगेश क्षीरसागर हे जर पंकजाताई धनंजय मुंडे यांचे उमेदवार राहतील तर यावेळी मात्र ही लढत जनतांना क्षीरसाग

## माजलगावातून ओबीसीचे माधव निर्मळ, बाबरी मुढे तर मराठा समाजातून चुलते पुतणे प्रकाश सोळंके जैसे सोळुंके रमेश आडसकर मोहन जगताप,

माजलगाव मतदार संघामध्ये मराठा समाजाचे आरक्षणाच्या प्रत्येक जाळपोळीच्या घटनांमध्ये आमदार साळुंके यांनी जातीयवाद करत मागासवर्गीय समाजाच्या मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांना अक्षरशः राजकारणाच्या सूडबुद्धीने ३०७ सारख्या मोठ्या गुन्ह्यामध्ये अडकून आपल्या राजकीय कारकीर्दीला फासून घेतलेली आहे माजलगाव चे आमदारकीचा नादामध्ये आता त्यांचे पुतणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते जयसिंह सोळुंखे हेही आमदारकीच्या रेसमध्ये उतरलेले असतानाच प्रकाश सोळुंकेचे डोकेदुखी वाढलेली आहे प्रकाश सोळंकेचा पराभव अटळ आहे तर धनंजय मुंडे व








प्रकाश दादा यांच्यामध्ये हे अंतर्गत पक्ष चा वाद आहे तर पंकजाताई मुंडे यांच्या विरोधामध्ये काम करण्यासाठी मराठा समाजातील कार्यकर्त्यांना आदेश यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले होते म्हणून मराठा समाजाने ताईच्या विरोधामध्ये काम करत असताना प्रकाश दादांचे कार्यकर्ते यांनी विरोधात तुतारी वाजवून ताईचा पराभव केला याचा राग पंकजाताई धनंजय मुंडे यांच्या मनात आहे ओबीसी मराठा वादामध्ये प्रकाश सोळंके यांना आता मताचा खूप मोठा फटका बसणार आहे तर यामध्ये भावी आमदारकीच्या रेस मध्ये रमेश आडसकर मोहन जगताप यावेळी उतरलेले आहेत मात्र मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी व सोळंके आडसकर जगताप यांच्या कार्यकर्त्यांनी बजरंग बाप्पाची तुतारी वाजविल्यामुळे माजलगाव मतदार संघातील या तिन्ही बिगड नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी बजरंग सोनवणे लीड दिली आणि यात भजन झाला म्हणून धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे हे या तिन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांच्या विरोधात आणि सोळंके आडसकर जगताप यांच्या विरोधात आता नवीन ओबीसी चेहरा देणार आहेत या नवीन चेहऱ्यामध्ये दिग्गज समजल्या जाणारे भाजपाचे युवा नेते बाबरी शेठ मुंडे तसेच धारूर नगरीचे व एक हाती धारूर तालुक्यातील सत्ता असलेले ओबीसी चे नेते माधव निर्मळ हे या मतदारसंघांमध्ये नक्कीच उमेदवारी साठी आपली पकड नेत्यांवरती ठेवली आहे यावेळी माधव निर्मळ यांना व बाबरी शेठ मुंडे यांना नक्कीच यावेळी माजलगाव मतदार संघातून एक मोठी ताकद मिळून ते आमदार होऊ शकतात म्हणून पंकजाताई व धनंजयभाऊ ओबीसी म्हणून माधव निर्मळ यांना पंकजाताई व धनु भाऊ हे तिकीट देऊन नक्कीच उभी समाजाने यादीतील अशी अपेक्षा माजलगाव मतदारसंघांमध्ये चर्चा जोर धरून लागले आहे माधव निर्माण या अगोदर माजलगाव मतदार संघावरती मोठी राजकीय पकड असलेले नेते असून यावेळी बाबरी मुंडे हे सुद्धा माजलगाव मतदार संघामध्ये युवा नेता म्हणून प्रसिद्ध असलेला चेहरा आहे म्हणून या दोघांपैकी एकाला पंकजाताई व धनु भाऊ हे नक्कीच आमदार करतील आणि सोळंके जगताप आडसकर यांना घरचा रस्ता दाखविण्याच्या तयारी मध्ये असल्याची चर्चाही यावेळी ओबीसी मराठा वादामध्ये ऐकायला मिळत आहे.

# विधानसभेसाठी चंद्रशेखर घुले पाटलांच्या डोक्यात नेमकं काय?; अजितदादा की भाजप?

## शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात रंगलीय राजकीय चर्चा!

विधानसभा निवडणूक वार्तापत्र प्रशांत बाफना ८०५५४४०३८५

नगर/शेवगाव (प्रशांत बाफना) - लोकसभा निवडणूक निकालानंतर शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात विधानसभेचे वारे जोरात वाहू लागले आहेत. तसेच इच्छुकांच्या राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. शेवगावचे माजी आमदार घुलेबंधूचे पुढील राजकीय भवितव्य काय? असा सवाल व्यक्त होत असतानाच, माजी आमदार नरेंद्र घुले यांनी वाढदिवसाच्या कार्यक्रमात विद्यमान लोकप्रतिनिधीच्या कारभारावर टीका करून विकासासाठी हक्काचा माणूस विधानसभेत पाठवण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन केल्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत. मात्र उमेदवारी कोणाची अजित पवार की भाजप? की वेगळेच काही तरी, याची मतदारसंघात आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या मतदारसंघातून लोकसभेसाठी नीलेश लंके यांना चांगली मते मिळाली असून, त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रतापकाका ढाकणे यांनी पुढाकार घेतला होता. त्यामुळे प्रतापकाकादेखील यावेळेस पुन्हा एकदा मतदारसंघातून उभे राहणार असल्याची जोरदार चर्चा आहे. तेव्हा यंदाची लढत तिरंगी होते की, चौरंगी याबाबतही राजकीय चर्चांना गावोगावी उधाण आलेले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर काही महिने शांत राहिलेले माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आपले राजकीय पत्ते उघड करून अखेर खासदार शरदचंद्र पवार यांच्या गटाला ऐनवेळी सोडचिठ्ठी देत, उपमुख्यमंत्री अजित पवार गटात प्रवेश केला होता. त्यानंतर आम्ही सोबत येतोय पण आमच्या मताचे मूल्यमापन होईल का, असा सवाल श्री घुले यांनी व्यक्त केला होता. तसेच लोकसभेसाठी चंद्रशेखर घुले यांनी महायुतीच्या उमेदवाराचा जोरदार प्रचारदेखील केला होता. मात्र त्यांचे बंधू माजी आमदार नरेंद्र घुले, युवा सभापती डॉ. क्षीतिज घुले हे मात्र लोकसभा निवडणुकीच्या प्रचारापासून थोडे अलिप्त राहिल्याचे दिसून आले. मात्र लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नीलेश लंके यांनी बाजी मारली. तर महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांना अल्पमतांनी पराभव पत्करावा लागला. आता विधानसभा निवडणूक तोंडावर आली असल्याने शेवगाव-पाथर्डी मतदरसंघात इच्छुक असलेले भाजपकडून पुन्हा आमदार मोनिका राजळे, शरदचंद्र पवार राष्ट्रवादीकडून प्रतापराव ढाकणे, तर माजी आमदार चंद्रशेखर



**राष्ट्रवादी शरद पवारांकडून प्रतापकाका ढाकणे मैदानात उतरणार; भाजपकडून मोनिका राजळेंना उमेदवारी मिळणार का?**

घुले, जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे यांच्यासह ओबीसीनेते दिलीपराव खेडकर, भाजपचे गोकुळ दौंड, अरुण मुंडे यांनी निवडणूक लढविण्यासाठी राजकीय हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र भाजपच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे यांना डावलून भाजप हा अजित पवार गटाला जागा सोडणार का? तसेच भाजपच्या गटबाजीतून दौंड - मुंडे उमेदवारी मिळण्यासाठी यशस्वी होतील का? असा यक्ष प्रश्न उपस्थित होऊन त्याची जोरदार चर्चा सुरू असतानाच, माजी आ नरेंद्र घुले यांनी अभीष्टचिंतन सोहळ्यात कोणत्याही परिस्थितीत विधानसभा निवडणूक लढण्याचे जाहीर केल्याने आता उमेदवारी नेमकी कोणाची? अशी मतदारसंघात चर्चा सुरू आहे. माजी आमदार चंद्रशेखर घुले यांची आक्रमक शैली ही सर्वश्रुत असल्याने त्यांच्या भविष्यातील राजकीय भूमिकेचा अंदाज लागणे कठीण झाले आहे. तसेच घुलेबंधूंनी सातत्याने शरदचंद्र पवार यांना समर्थन दिले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष आ. जयंत पाटील यांचे घुलेबंधुंसोबतचे नातेसंबंध सर्वश्रुत आहे. त्यामुळे घुलेबंधू ऐनवेळी कोणती राजकीय चूल मांडतात त्या भूमिकडे सर्वांचे लागून आहे.

**शरद पवारांची भिस्त प्रतापकाकांवर**

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात भाजपला मिळालेला साडेसात हजाराचा लीड पाहता, भाजपच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे यांची जमेची बाजू होऊन उमेदवारी निश्चित मानली जात आहे. परंतु भाजपच्या अंतर्गत गटबाजीचा काही फटका बसतोय का? तसेच शरदचंद्र पवार गटाचे प्रतापराव ढाकणे यांनी अनेक वर्षापासून विधानसभेची तयारी सुरू केली असतानाच, लोकसभेत खासदार नीलेश लंके यांची एकाएकी खिंड लढवली गेल्याने त्यांची शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. तसेच माजी आमदार घुले यांनी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविण्याची घोषणा केल्याने घुलेबंधूंच्या डोक्यात नेमक चाललंय तरी काय? अजित दादा, का भाजप? पुन्हा शरद पवार? की अजून काही वेगळेच? याची मतदारसंघात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. घुले निवडणूक रिंगणात उतरल्यास इच्छुकांची संख्या वाढून तूल्यबळ बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. पण त्यासाठी काही महिने वाट पाहावी लागेल, हे तितकेच खरे ठरणार आहे. त्यासाठी जोरदार राजकीय हालचाली सुरू झाल्याचे दिसत आहे.

**अजित पवारांकडे शेवगावसाठी घुलेंचा अग्रह!**

शेवगावची जागा कोणत्याही परिस्थितीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला काँग्रेसला प्राधान्याने मिळावी, अशी पक्षश्रेष्ठीकडे घुलेबंधुंनी जोरदार मागणी करून प्रबळ दावा करण्यात आला असल्याचे बोलले जात आहे. परंतु भविष्यकाळात पक्षश्रेष्ठी ऐनवेळी काय निर्णय घेणार, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित असलेल्या शेतकऱ्यांनी ई केवायसी तात्काळ करावी

## तहसीलदार श्री. मोहनलाल हरणे यांचे आवाहन

**शिरुरकासार /प्रशांत बाफना**

**शिरुरकासार तालुक्यातील शेतकरी खातेदारांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, सन २०२२-२०२३ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पात्र शेतकऱ्यांना केंद्रीभूत पध्दतीने थेट लाभार्थी हस्तांतरण प्रणालीमार्फत मदत वितरीत करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या आयटी मार्फत विकसित संगणक प्रणाली मार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी वितरण सुरु आहे. यापुर्वी शेतकरी खातेदार यांनी ई केवायसी करुन मदत प्राप्त करवुन घेतली परंतु अद्यापही अनेक पात्र लाभार्थी खातेदार यांनी ई केवायसी न केल्याने मदत जमा होऊ शकलेली नाही.**

ज्या पात्र लाभार्थी यांना यादीत नांव असूनही रकमेचे प्रदान झाले नाही अशा शेतकऱ्यांची गांव निहाय यादी डकविण्यात आलेली आहे. सदर मदत उपलब्ध होण्यासाठी दिनांक- २५ जुन २०२४ पर्यंत प्रलंबित ई केवायसी च्या अनुषंगाने सर्व तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्यामार्फत गांवनिहाय विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अनुदान यादीमध्ये प्रत्येक लाभार्थी यांच्यासाठी एक स्वतंत्र क्रमांक तयार करण्यात आला असुन त्याला विशिष्ट क्रमांक असे संबोधण्यात येते. सदर क्रमांक तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांचेकडुन घेऊन संबंधित शेतकरी खातेदार यांनी जवळच्या महा ई सेवा केंद्र किंवा आपले सरकार सेवा केंद्र या ठिकाणी जाऊन आधार क्रमांकाद्वारे आपली ओळख पटवुन आधार प्रमाणीकरण (ए-घधउ) करायचे आहे. सदर सेवा ही निशुल्क असेल. सदर आधार प्रमाणीकरण (ए-घधउ) केल्यानंतर सात दिवसांत मदतीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यत जमा होईल.

तसेच काही लाभार्थी यांचे आधार बँक खात्याशी संलग्न नसल्याने किंवा त्यांचे खाते सुरु नसल्याने बँकेने अशा रकमा प्रदान केल्या नाहीत, अशा लाभार्थ्यांनी त्यांचा आधार क्रमांक, बँकेत किंवा आधार केंद्रात जाऊन बँक खात्याशी संलग्न/ अद्ययावत करावा.

वरील कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने मदतीची रक्कम प्राप्त करवुन घ्यावी, असे आवाहन तहसीलदार श्री. मोहनलाल हरणे यांनी केले आहे.

# जिजामाता योग क्लासचा योगा दिन उत्साहात साजरा

## योगा क्लासच्या माध्यमातून महिलांचे सशक्तिकरण : एपीआय जंजाळ

जागतिक योग दिनानिमित्त जिजामाता योग क्लासच्या वतीने शहरात महिला सशक्तीकरण आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४ कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित विदेशातही योग च्या माध्यमातून लोकांना आरोग्य दिले असे राहुल पानखडे, गेवराई पोलीस स्टेशनचे एपीआय संतोष जंजाळ, आयोजक गीताभाभी पवार, पतंजली योगशिक्षक राजेंद्र बरकसे, अशोक गायकवाड, राम चाळक, मुनेश्वर, जिजामाता योगा क्लास प्रमुख सदस्य सौ.रत्नमाला नानी मोटे यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेष योग शिबिरात दोनशे पेक्षा जास्त महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.याबाबत सविस्तर वृत्त असे की, जागतिक योग दिनानिमित्त जिजामाता योग क्लासच्या वतीने शहरात महिला सशक्तीकरण आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४ कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित विदेशातही योग च्या



माध्यमातून लोकांना आरोग्य दिले असे राहुल पानखडे, गेवराई पोलीस स्टेशनचे एपीआय संतोष जंजाळ, आयोजक सौ. गीताभाभी पवार पतंजली योगशिक्षक बरकसे, अशोक गायकवाड, राम चाळक, मुनेश्वर,जिजामाता योगा क्लास प्रमुख सदस्य सौ.रत्नमाला नानी मोटे यांच्या हस्ते करण्यात आले. या विशेष योग शिबिरात दोनशे पेक्षा जास्त महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे सर्व महिलांनी विविध प्रकारचे ड्रेस कोड परिधान करून योगा केल्याने या कार्यक्रमाला आणखी चांगल्या प्रकारचे स्वरूप आले. आजच्या धकाधकीच्या, वेगवान युगात योगासने अत्यंत महत्त्वाची आहेत, मात्र जास्तीत जास्त महिलांनी योगा शिकल्यास त्याचा घरासाठीच नव्हे तर, समाजालाही मोठा फायदा होईल व या माध्यमातून महिला सशक्तिकरण करण्यात येत असून याचा फायदा महिलांना होत आहे असे मत प्रमुख पाहुणे एपीआय संतोष जंजाळ यांनी व्यक्त केले. तसेच तणावमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने रोज ठराविक वेळ देण्याची गरज असल्याचे आयोजक गीता भाभी पवार यांनी म्हटले आहे. करो योग ,रहो निरोग जागतिक योग दिनाच्या निमित्ताने, जिजामाता योग क्लासच्या माध्यमातून, आदरणीय गीता भाभी यांच्या संकल्पनेतून, योग दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. फक्त योग दिनासाठीच योग केला जात नसून महिलांच्या प्रेरणास्थान सौ.गीता भाभी पवार यांच्या माध्यमातून वर्षभर महिलांसाठी योग अभ्यास वर्ग चालू आहे. अनेक महिलांचे आजार या माध्यमातून दूर झाले असून, जागतिक योग दिनाच्या माध्यमातून सर्व महिला एकत्र करून वर्षभर हा उपक्रम राबवला जातो

# भैय्यासाहेब जगताप यांच्या तक्रारीची दखल

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने केली विद्यार्थ्यांची शिक्षण फी परत....!**

या संदर्भात सविस्तर वृत्त असे की, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष ०२०-२१, ०२१-२२ मधील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य इतर शुल्क आकारले होते. यासंदर्भात विद्यार्थ्यांनी सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते भैय्यासाहेब तानाजी जगताप यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. याप्रकरणी जगताप यांनी सोलापूर जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे कारवाई ची मागणी केली होती. यावर तात्काळ सहाय्यक आयुक्तांनी महाविद्यालयाला नोटीस बजावत खुलासा मागितला व कायदेशीर कारवाई चा इशारा दिला होता. महाविद्यालयाने चूक मान्य करत ही बाब नजरचुकीने झाल्याचे स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना शिक्षण फी परत करत असल्याचे जाहीर केले आहे व फी परत



करण्याची प्रक्रिया महाविद्यालयाने सुरु केली .

शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश फी व इतर फी घेऊ नये असे नियम आहेत तरीही काही महाविद्यालय अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क वसूल करतात ही बाब गंभीर आहे. याबाबत सहाय्यक आयुक्तांनी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे असे मत सा. कार्येकर्ते भैय्यासाहेब तानाजी जगताप यांनी व्यक्त केले.

# साईबाबा संस्थान ट्रस्टने केले दूर्लक्ष ?

## अन्याय झालेल्या दिपक गायकवाड यांना कोण न्याय देणार

**अ.नगर : छातीत दुखत असल्याने, श्री. साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीच्या, श्री. साईनाथ रुग्णालयात उपचारासाठी गेलेल्या एका युवकाचा उजवा हात, रूग्णालयाच्या निष्काळजीने निकामी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, सदरील प्रकार न्जिओग्राफी व न्जिओप्लास्टी करते वेळी झाला असून, गायकवाड कुटुंबाला मानसिक धक्का बसला आहे.**

**रुग्णालय प्रशासनाने रुग्णाला वाऱ्यावर सोडून, आपल्या बाबांची आणि संस्थानची बदनामी होईल. त्यामुळे, गप्प बसा, अशी दमदाटी केली. रुग्ण व नातेवाईकांवर दबाव आणला. विशेष म्हणजे, कुटुंबाची उपजीविका उपचाराने बाधित झालेल्या युवकावर अवलंबून आहे. बारा वर्षांपासून संस्थानात काम करणाऱ्या दिपकला पून्हा रुजू करून घेण्यात नकार दिला. श्री साईबांबाच्या नावाखाली मनमानी करणारा संस्थानचा कारभार, या घटनेच्या निमित्ताने चव्हाटयावर आला असून, अन्याय झालेला दिपक संजय गायकवाड वय वर्ष ३२ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरबारात जाऊन न्याय मागणार आहेत.**

दरम्यान, अन्याय झालेल्या कुटुंबा विषयी सहानुभूतीपूर्वक विचार का करण्यात आला नाही. असा संतप्त सवाल विचारला साई भक्तांनी विचारला आहे.दिपक संजय गायकवाड रा. शिर्डी ता. राहता जि. नगर यांचा १७ सप्टेंबर २०२३ रोजी अचानक छातीत त्रास होऊ लागल्याने, श्री. साईनाथ संस्थान शिर्डीच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी तपासून, त्यांना डमिट करून घेतले. त्यांच्यावर न्जिऑग्राफी, न्जिओप्लास्टी करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, ही शस्त्रक्रिया करताना स्टेन्स तुटली. त्यामुळे, रुग्णाची तब्येत अचानक बिघाडली. प्रचंड वेदना झाल्या. डॉक्टरांनी धावपळ केली. परंतू, स्टेन्स निघाली नाही. तोपर्यंत, रुग्णाला आयसीयू मध्ये हलविण्यात आले. अगदी छोटेसे ऑपरेशन करावे लागेल. असे सांगून, तब्बल पंधरा दिवस रुग्णाला डमिट करून ठेवले. कुटुंबाला भेटू दिले नाही. सगळे व्यवस्थित आहे. घाबरू नका, रुग्णाला आरामाची गरज आहे. आताच भेटता येणार नाही. लांबूनच पहा, अशा सबबी सांगून दिपकच्या कुटुंबाला, उपचारा संदर्भात कोणतीच माहिती देण्यात आली नाही. रुग्णाच्या उजव्या हाताला महिनाभर बॅन्डेज बांधण्यात आले. छोटेसे ऑपरेशन करू म्हणणार्या, साईनाथ रुग्णालयाच्या डॉक्टरांनी दिपकचा उजवा हात एक, सव्वा फुटांपर्यंत कापला आहे. रुग्ण वाचला मात्र , उजव्या हाताच्या व्हेन निकामी झाल्यात. उजव्या हाताची कसलीच हालचाल होत नाही. एवढे असूनदेखील, गायकवाड कुटुंबाने चक्कार शब्द काढला नाही. आपला मुलगा संस्थान मध्ये कामाला आहे. संस्थान आणि रुग्णालय प्रशासन, आपल्या सारख्या गरीब कुटुंबावर अन्याय करणार नाही. अशी अपेक्षा व्यक्त



करणाऱ्या गायकवाड कुटुंबाची साधी विचारपूस तर सोडा, सहानुभूती दाखवायची सोडून, संस्थानच्या अधिकाऱ्यांनी अरेरावी केली. गायकवाड कुटुंबाला धमकावण्यात आले. नौकरीवर घेता येणार नाही. तू आता अपंग झालास, गेट आऊट ; कुठेही जा, आमचे कोणी काही वाकडे करणार नाही. रुग्णालय प्रशासनाने घेतलेली भूमिका चीड व्यक्त करणारी आहे. एका तथाकथित पत्रकाराने शिर्डीच्या गायकवाड कुटुंबाला सहानुभूती दाखवली. तुमची बातमी करतो म्हणून माहिती घेतली. व्हिडीओ केला. मात्र, दोन दिवसानी त्याच पत्रकाराने गायकवाड कुटुंबाची भेट घेऊन, फोन करून तुम्ही बातमीच्या भानगडीत पडू नका, साई संस्थान खूप मोठे आहे. असे उपदेशाचे डोस पाजले. रुग्णाच्या टाळुवरचे लोणी खाऊन,

साई संस्थानच्या वाहत्या पाण्यात हात धुतल्याची चर्चा आहे. दिपक गायकवाड यांच्यावर एन्जियोग्राफी, ऐन्जिओप्लास्टी करते वेळी निष्काळजीपणा झाला. प्रकरण हाताबाहेर गेल्यावर, रुग्णालयाने दिपकला महिनाभर डमिट केले. दोन वेळा शस्त्रक्रिया करावी लागली. तेव्हा कुठे रुग्ण वाचला. मात्र, रुग्णाचा उजवा हात जवळपास निकामी झाला आहे. हाताला मोठी जखम झाली आहे. त्यामुळे, हातावरच्या व्हेन मृतावस्थेत गेल्यात. हात कसल्याही प्रकारे वर्क होत नाही. गायकवाड कुटुंब उघड्यावर आले आहे. कर्ता पुरुष घरी बसून आहे. संस्थानने पून्हा सेवेत सामावून घेण्यात नकारघंटा वाजवली आहे. संस्थानातले तथाकथित जहागिरदार, श्री. साईबाबांच्या नावाखाली दादागिरी करून, साई बाबांची बदनामी करीत आहेत. हा सगळा प्रकार, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य मंत्री उदय सामंत यांच्याकडे रितसर तक्रार करून, संस्थानचा तकलादू कारभार लक्षात आणून देण्यात येणार आहे. हातावर पोट असलेल्या गायकवाड कुटुंबाला अचानक दुखाच्या प्रसंगाला सामोरे जावे लागले आहे. साई संस्थान च्या निगरगट्ट प्रशासनाने गायकवाड कुटुंबाला न्याय दिला नाही. गोरगरीबांचे सरकार असलेले महाराष्ट्र सरकार न्याय देईल का ? या कडे लक्ष लागले आहे.

# लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी राजेश वाहुळे यांची फेरनिवड

## निष्ठावंत राजेश वाहुळे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी लढणारा पक्ष म्हणून लोक जनशक्ती पार्टीची संपूर्ण देशात सर्वदूर ओळख आहे. लोक जनशक्ती पार्टी व दलित सेनाचे संस्थापक नेते दिवंगत माजी केंद्रीय मंत्री रामविलासजी पासवान यांच्या प्रेरणेने सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करीत असलेल्या लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी राजेश बालाजी वाहुळे यांची फेरनिवड नुकतीच करण्यात आली आहे. निष्ठावंत कार्यकर्ते वाहुळे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार यांच्या आदेशावरून युवा प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलु यांनी शिर्डी येथे स्वतःचे हस्ते नियुक्तीपत्र देवून लोक जनशक्ती पार्टीच्या मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी राजेश बालाजी वाहुळे यांची फेरनिवड केली आहे. नियुक्तीपत्रात मराठवाडा प्रदेशात पक्ष बळकटीसाठी संघटन मजबूत व व्यापक करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करून दलित, बहुजन व अल्पसंख्याकांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांसाठी न्याय मिळवून देण्याकरिता सदैव प्रयत्नशील रहावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. राजेश वाहुळे हे येथील आंबेडकरी चळवळीतील एक अभ्यासू युवा कार्यकर्ते आहेत. ते मागील एकोणवीस वर्षांपासून सामाजिक व दलित चळवळी मध्ये कार्यरत आहेत. चळवळी मध्ये त्यांचे सातत्यपूर्ण योगदान आहे. युवा कृती समितीचे अंबाजोगाई जिल्हा निर्मिती आंदोलनात सहभाग, जयवंती नदी वाचवा जनआंदोलन, नगरपालिकेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जनहिताचे कार्य करावे, स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा करा, नळपट्टी माफ करा, नियमित स्वच्छता करून साथरोगांचा फैलाव थांबवा, दलित वस्ती सुधार योजना राबवा अशा मागण्या केल्या तसेच नगरपरिषद टेंडर घोटाळा उघडकीस आणला, तहसीलच्या अन्न व पुरवठा विभागाकडून गरजूंना स्वस्त धान्य वाटप करायला लावले, रेशनचा काळाबाजार थांबवला, विविध शासकीय कार्यालयातील सतत अनुपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांची पोलखोल केली. शासकीय भूखंड विक्री उजेडात आणली. राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरण, डिव्हायडर बसविण्यासाठी तसेच स्वाराती शासकीय वैद्यकीय रूग्णालयातील दर्जेदार आरोग्य सेवा, सुविधांसाठी पाठपुरावा केला.



आरटीओ कार्यालय, शिक्षण विभाग येथील अनागोंदी कारभार उघडकीस आणला. खोटी ॲट्रोसिटी मागे घ्यावी यासाठी, तसेच दप्तर दिरंगाई, गैरव्यवहार यावर वेळोवेळी प्रहार ही केला. शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार, विद्यार्थी यांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. प्रसंगी बेमुदत आमरण उपोषण, निवेदन, आंदोलन केले. मोर्चे ही काढले. २०० हून अधिक विविध लक्षवेधी निवेदन देवून प्रसंगी आंदोलने ही केली. जनहितासाठी अनेकदा त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. अशा राजेश वाहुळे यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून विविध आंदोलनांच्या माध्यमातून प्रसंगी राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांच्याशी विधायक संघर्ष ही केला आहे. बांधिलकी जोपासत गोरगरीब, गरजू लोकांना दवाखाना असो, तहसील असो किंवा पोलिस स्टेशन येथे त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वाहुळे हे सदैव प्रयत्नशील असतात. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन निष्ठावंत कार्यकर्ते राजेश वाहुळे यांची शिर्डी येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत फेरनिवड करण्यात आली आहे. यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकारी ज्ञानेश्वर खरात, जिल्हाध्यक्ष साहेबराव नवतुरे, अण्णा नरवडे (शहर कार्याध्यक्ष), प्रवीण मोरे शहराध्यक्ष (पश्चिम), अश्विनी गुंडे (जिल्हा सचिव), राजेश घुसर शहराध्यक्ष (मध्य), डॉ.सुनील महाकाळे, राहुल गंगावणे (शहराध्यक्ष पूर्व), ज्ञानेश्वर गोरे (बीड जिल्हाध्यक्ष, लोक जनशक्ती पार्टी युवा.), अशोक काळे (लोक जनशक्ती पार्टी अंबाजोगाई तालुकाध्यक्ष युवा, आदित्य चौरे (अंबाजोगाई तालुका कार्याध्यक्ष लोकजनशक्ती पार्टी युवा.), प्रदीप गुंडरे (अंबाजोगाई शहराध्यक्ष लोक जनशक्ती पार्टी युवा.) यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. राजेश वाहुळे यांच्या फेरनिवडीचे मराठवाड्यातून स्वागत होत आहे.

लोक जनशक्ती पार्टीचा विचार मराठवाड्यात सर्वदूर पोहोंचवणार :

राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे अन्न, प्रक्रिया खात्याचे कॅबिनेट दर्जाचे मंत्री चिरागजी पासवान, युवा राष्ट्रीय अध्यक्ष प्रणव कुमार, युवा प्रदेशाध्यक्ष मोहन अनमोलु यांनी मराठवाडा प्रदेशाध्यक्षपदी माझी फेरनियुक्ती करून पुन्हा जबाबदारी सोपविली आहे. त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. नेत्यांचा विश्वास आपण सार्थ ठरवू, पुढील काळात लोक जनशक्ती पार्टीची संघटनात्मक बांधणी केली जाईल, संघटनेच्या सर्व आजी - माजी पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन लोक जनशक्ती पार्टी हा पक्ष मराठवाड्यात अधिक बळकट करणार आहोत.



फकीर जवळा मृगदायनवन महाविहार येते पौर्णिमेनिमित्त बौद्ध उपासक उपासिका यांना मार्गदर्शन संपन्न धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथे ज्ञानालंकार बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण संस्था संचलित मृगदाय वन महाविहार जवळा फकीर तालुका धारूर जिल्हा बीड सारनाथ पार्क भूदान करणारा चे नाव आयु प्रभाकर सोनबा गवळी शांता प्रभाकर गवळी यांनी गट नंबर १२९ मधील एक एकर जमीन दान दिलेली आहे तसेच या संस्थेचे अध्यक्ष भदंत पय्यातिस्स थेरो यांच्या संकल्पनेतून प्रत्येक पौर्णिमेला या मृगदायवन महाविहार येथे सर्व बौद्ध उपासक उपासिका यांना बौद्ध धर्माचा प्रचार प्रसार मार्गदर्शन अध्यक्ष भदंत पय्यातिस्स थेरो यांनी परिसरातील फकीर जवळा हिंगणी वांगी शिरसाळा काळेवाडी खाडेवाडी नाकळगाव पिंपळगाव दिंद्रुड तेलगाव बीड संगम चाटगाव देवदहिफळ येथील आलेल्या सर्व उपासक बांधवांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले यावेळी सामाजिक कार्यकर्त्या स्नेहा खंडागळे बीड लिंबाजी चांगोजी गवळी सुमित प्रभाकर गवळी दीपक गौतम गवळी अशोक भाऊसाहेब गवळी सिद्धार्थ लिंबाजी गवळी अंकुश गायकवाड सुखदेव नारायण गायकवाड नानाभाऊ तात्याबा गायकवाड जानकीराम मोतीराम गवळी आदी बौद्ध उपासक उपासिका यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला तसेच नंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद पण घेतला दर पौर्णिमेला या मृगदायन महाविहार येते सर्व उपासक उपासिका यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान सामाजिक कार्यकर्त्या स्नेहा खंडागळे यांनी केले आहे

# बीड जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा तातडीने भरा-माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदाच्या रिक्त जागा अनेक वर्षापासून तशाच आहेत राज्य शासनाकडून या जागा भरण्याबाबत अनेक वेळा सूचना आल्या होत्या मात्र तरीही या जागा भरल्या गेल्या नाहीत पोलीस पाटील संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या जागा तातडीने भराव्यात अशा प्रकारचे निवेदन दिले आहे

बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पोलीस पाटलांच्या जागा रिक्त या




साठीची बिंदू नामावली अंतिम होऊन आरक्षण ही जाहिर झालेले आहे. परंतु पुढील भरतीची प्रक्रिया सुरु झालेली नाही. अनेक गावातील पदे रिक्त असल्यामुळे पोलीस

प्रशासनाला कायदा व सुव्यवस्थेसाठी अडचण निर्माण होत असून अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तरी या बाबत तातडिने कार्यवाही करण्यात यावी. बीड जिल्ह्यात सातशे गावांमध्ये पोलीस पाटील पदे आहेत, तिला अनेक गावांमध्ये पोलीस पाटील नसल्यामुळे स्थानिक पोलिसांना देखील या ठिकाणी अडचण निर्माण होऊ लागले आहे अनेक गावच्या कारभारात पोलीस पाटलाची महत्त्वाची भूमिका असते त्यामुळे या जागा भरणे खूप महत्त्वाचे आहे पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या जागा तातडीने भराव्यात अशी मागणी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केली आहे

# वसंत महोत्सवात होणार गोरबंजारा उद्योजकांचा सत्कार आणि सन्मान - उद्योजक रामशेठ राठोड

माजलगाव /प्रतिनिधी

हरित क्रांतीचे प्रणेते, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या जन्ममहोत्सवा निमित्त वसंत महोत्सवाचे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे .१ जुलै ते ३१ जुलै दरम्यान होणाऱ्या या वसंत महोत्सवाचा शुभारंभ १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव (बीड, मराठवाडा) येथे आयोजित करण्यात आला आहे. या वेळी वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार अशा कार्यक्रमांचे आयोजन तसेच वसंत व्याख्यान मालिकेचे आयोजन करण्यात आले आहे तसेच यावेळी गोरबंजारा समाजातील उद्योजकांचही सत्कार सन्मान होणार

असल्याचे मुंबई येथील उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते रामशेठ राठोड यांनी कळवले आहे. गोरबंजारा सांस्कृतिक प्रदर्शन रॅली, नाशिक ढोल-ताशा, डफडा , महिला नृत्य, घोडा, हत्ती रथ, भजनी मंडळ, असंख्य समाजबांधव, धर्मगुरू यांसोबत महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्या प्रतिमा रॅलीचे यावेळी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी गोरधर्म पिठाधीश्वर बाबूसिंग महाराज, गोरधर्म पिठाचे धर्मगुरू महंत जितेंद्र महाराज, धर्मगुरू कबीरदास महाराज, धर्मपीठ प्रवक्ता साहेबराव शात्री महाराज, अनिल महाराज, यांचे सह अनेक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन राष्ट्रीय बंजारा सेवा संघ तर्फे उद्योजक तथा युवा नेते राजेशभैय्या राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी केले आहे उद्योगपती राजेशभैय्या राठोड यांचा याच दिवशी वाढदिवस असून भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भव्य रॅलीचे आयोजन केले असून त्यात वेशभूषा परंपरागत थाळी नंगारा नृत्यासह बंजारा महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतील ढोल ताशा घोडे, हत्ती व बैलगाडीतून बंजारा समाजाच्या लदेणीची वैभवशाली परंपरा व संस्कृतीचे दर्शन बघायला मिळणार आहे वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे भव्य रॅली मार्ग छत्रपती संभाजी महाराज चौक ते वसंतराव चौक (माजलगाव) असा असणार आहे. रॅलीच्या वेळी शहरात भव्य आतिषबाजी करण्यात येणार आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज



व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे गोरविचार पीठावरुन बसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याचा गौरव केला जाणार आहे.

महानायक वसंतराव नाईक यांच्या जीवनावर व्याख्यान माला आयोजित केली असून वक्त्यांनी आपली नावे कळवावी असे आवाहन राष्ट्रीय गोरबंजारा सेवा संघातर्फे करण्यात आले आहे वसंतराव नाईक यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचावे व महानायक वसंतराव नाईक यांच्या विचारांवर समाजाची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ व्हावी अशी इच्छा आयोजक राजेश राठोड यांनी व्यक्त केली तेरा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या महानायक वसंतराव नाईक यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत गोरबंजारा समाजाने आता राजकीय क्षेत्रात उतरले पाहिजे व मोठ्या प्रमाणात जिल्हापरिषद पंचायतसमिती ते विधानसभेपर्यंत बंजारा समाजाचा आवाज घुमला पाहिजे असे मत भगवंतसेवक किसनराव राठोड यांनी व्यक्त केलेया कार्यक्रमांसाठी संपूर्ण राज्यातील प्रमुख लोकांची उपस्थिती असणार आहे यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली नावे कळवावी व्याख्यान मालेमध्ये भाग घेणाऱ्या वक्त्यांनी आपली नावे कळवावी आणि विविध उपक्रमांसाठी समाजबांधवांनी आपली नावे कळवावीत असे आवाहन सुद्धा रामशेठ राठोड यांनी केले १ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचा शुभारंभ होईल ११ ते १ वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न होईल १ वाजता नाईक साहेबांच्या प्रतिमेचे पूजन धर्मगुरूंच्या हस्ते सन्मान पुरस्कार व स्नेहभोजन असे आयोजन असेल , दुपार पासून व्याख्यान माला सुरू होईल. सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली जाईल. सायंकाळी ७ वाजता राज्यभर जयंतीमहोत्सव साजरे करण्यासाठी, वसंतराव नाईक यांच्या कार्याचा प्रकाश दूरवर पसरण्यासाठी भव्य आतिषचाजीचे आयोजन करण्यात आले आहे साधारणतः सायंकाळी ७ वाजता भव्य आतिषबाजी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे युवा उद्योजक राजेशभैय्या राठोड यांचा वाढदिवस येथे केक कापून साजरा केला जाणार आहे या कार्यक्रमाचा उत्साह संपूर्ण मराठवाड्यातून दिसून येत आहे या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय बंजारा सेवा समितीचे पदाधिकारी तथा आयोजक राजेश राठोड व उद्योजक रामशेठ राठोड यांनी यावेळी केले आहे.



शिवसंग्रामचे संस्थापक लोकनेते स्व.आ. विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त आयोजित कृतज्ञता सप्ताहाच्या प्रथम दिनाच्या आयोजित कार्यक्रम व बीड जिल्हा पोलीस मुख्यालय येथे सुरू असलेल्या पोलीस भरतीतील विद्यार्थ्यांना अल्पोपराचे वाटप कार्यक्रमास उपस्थित जिल्हा पोलीस अधीक्षक मा. नंदकुमार ठाकुर साहेब यांच्या समवेत सप्ताहच्या विविध कार्यक्रम व उपक्रमा विषयी माहिती देतांना सुशांत सत्राळकर.

# धोकादायक वर्गखोल्या ; विद्यार्थ्यांचे जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि शिक्षण विभागाला जाग येणार का?

## सीईओ अविनाश पाठक यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक,ई लर्निंग,वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस च-हाटकर,शेख मुबीन यांनी अविनाश पाठक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री ,शालेय शिक्षणमंत्री, पालकमंत्री बीड यांना केली आहे.

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.जिल्ह्यात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन मोठा पाऊस अथवा वादळवारे आल्यास धोका निर्माण होऊ शकतो.जिल्हा परीषदेच्या शाळांच्या ईमारतीची दुरावस्था असुन कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत तर कुठे छत उघडे पडलेले तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांची अडचण होत असुन दुर्घटना घडल्यास यास जबाबदार कोण?? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय मोडकळीस आलेल्या शाळा खालिल प्रमाणे आहेत.

आष्टी तालुका ८० शाळांमधील ११९ वर्गखोल्या, अंबेजोगाई तालुक्यातील १६ शाळांमधील ३० वर्गखोल्या, बीड तालुक्यातील २८ शाळांमधील ३७ वर्गखोल्या,धारूर तालुक्यातील १७ शाळांमधील ३० वर्गखोल्या,केज तालुक्यातील १९ शाळांमधील २२ वर्गखोल्या, गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या, माजलगाव तालुक्यातील १३ शाळांमधील २६ वर्गखोल्या, परळी तालुक्यातील ४६ शाळांमधील ८८ वर्गखोल्या, पाटोदा तालुक्यातील ३१ शाळांमधील ४० वर्गखोल्या, शिरूर तालुक्यातील २४ शाळांमधील ३२ वर्गखोल्या, वडवणी तालुक्यातील १३ शाळांमधील ४३ वर्गखोल्या एकुण ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे.

वायकर वस्ती येथे छत पडलेल्या वर्गात ज्ञानार्जन

बीड तालुक्यातील मांडवजाळी ग्रामपंचायत अंतर्गत पिंपळवाडी केंद्र अंतर्गत वायकर वस्ती येथील शाळेच्या एका वर्गाचे छत पुर्णपणे कोसळले असुन सध्या ज्या वर्गात मुलं ज्ञानार्जन करत आहेत त्या वर्गातील छत पडण्याच्या अवस्थेत असुन मुलांच्या जिवीताला धोका असुन शेतकरी ऊसतोड मजुरांच्या लेकरांनी पावसाळ्यात शाळा उघड्यावर कशी शिकायची असा संतप्त सवाल पालक दादु पवार,सुशीला बहिरवाळ, अमोल बहिरवाळ यांनी केला आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या




ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठाच नाही तर जिल्ह्यातील ४९७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. त्यामुळे संगणक,ई लर्निंग,एल ई डी टीव्ही, डिजिटल बोर्ड तसेच वीजेची उपकरणे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच

बहुतेक शाळात अंधार आहे.अनेक शाळांच्या मागील भागात गवत आणि झाडेझुडपे असतात त्यातुन कधी विंचु तर कधी सापही शाळेत येतात. अंधार असल्याने अनेकदा दिसत नाहीत.वीज असेल तर अशा प्रकारचा धोका होणार नाही.शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# सांची बुद्ध विहारात जेष्ट पौर्णीमा उत्साहात साजरी

माजलगाव /प्रतिनिधी

तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका - शाखा माजलगांव च्या वतीने जेष्ठ पोर्णिमा साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष आद.गुलाबराव धाईजे हे होते तर या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष एस.बी . मोरे ,जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे ,जिल्हा पर्यटन सचिव काशीराम साळवे ,एन. बी राजभोज, जिल्हा संघटक बी.सी . डोंगरे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अंकुश आण्णा जाधव , धम्मानंद साळवे, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे, हरिभाऊ साळवे,सेलापुरीचे उपसरपंच नाथाजी घडसे हे उपस्थित होते या कार्यक्रमात मान्यवरांनी ज्येष्ठ पौर्णीमेचे महत्व सांगत संस्थेची



कार्यपद्धती यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा ता संस्कार सचिव आशाताई मोरे यांनी केले तर , आभार भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य डी पी वाघमारे नाना यांनी मानले तर सत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले या कार्यक्रमा साठी आयु . कांताताई हिरवे, आयु .पंचशीला गायसंमुद्रे ' आयु . शशिकला संमुद्रे यांनी भोजन दान दिले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. भागवत साळवे ' चक्रधर पोटभरे ,डी पी पोटभरे आप्पा ,मोहनराव काकडे बाबासाहेब घनघाव,नितीन डोंगरे,राजभाऊ साळवे तात्यासाहेब साळवे ,भगवान डोंगरे,रामभाऊ डोंगरे ,सटवाजी मस्के,डी. के . संमुद्रे , फुलवरे ,विशाखाताई वाघमारे ,मंदाताई साळवे , रमाताई राजभोज ', निलाबाई साळवे ,छायाताई साळवे सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# दैठणा गावामध्ये कृषीकन्यांचे आगमन

आष्टी /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दैठणा येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्न श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाच्या पदवीच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थिनीचे ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आगमन झाले असून शेतकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच कृषी कन्या मुलींनी सर्व गावातील शेतकऱ्यांचे पुष्गुच्छ देऊन स्वागत केले.

ग्रामीण कृषी जागृती कार्यक्रम अंतर्गत या कृषिकन्या आठ आठवडे दैठणा गावामधे शेतीविषयक विविध कार्यक्रम राबविणार असून शेतकऱ्यांना माहिती तसेच आधुनिक शेती विषयक मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी कृषी कन्या शेळके प्रियंका, अनारसे काजल, गित्ते ऋतुजा, तागड सानिया,वाघ तनुजा, कळसकर समीक्षा, घोलप कीर्ती, निकाळजे आकांक्षा, अनारसे स्मिता यांचे ग्रामस्थांनी स्वागत केले.यावेळी सरपंच सपनाताई अस्वर व संदीप आस्वर तसेच ग्रामपंचायत सदस्य



सचिन राजगुरू, कैलास कदम, शिवाजी राजगुरू, राजू कदम,खंडू राजगुरू, शिवाजी लोंढे, चंद्रकांत शिंदे, बिभिशन पवार, बबन लांबडे, महादेव पवार ,राहुल कदम आदी शेतकरी यावेळी उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ कार्यक्रम समन्वय प्राध्यापक इर्शाद तांबोळी ,प्रा. गोकुळ नवसारे सर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ग्रामीण कृषी जागृती कार्यक्रम अंतर्गत कृषी कन्या ८ अठवडे दैठणा येथे कार्यरत राहुन शेतकऱ्यांना माहिती देऊन मार्गदर्शन करणार आहेत .



बीड - अंबिका चौक, पांगरी रोड येथे प्रो. प्रकाश जाधव यांच्या अक्षिता प्युरिफायर चा उद्घाटन सोहळानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलिस बॉईज अशोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष रवींद्र शिनगारे

# सामाजिक सलोखा टिकवण्याची जबाबदारी साहित्यिकांची - प्रा.डॉ.शिवाजी हुसे

शिरूर कासार (प्रशांत बाफना) : सामाजिक घडी विस्कळीत झाल्यानंतर पूर्वीपासूनच कवी, लेखकांनी जबाबदारीचे भान राखत आपली लेखणी चालवलेली असून वर्तमानाचा विचार करता पुन्हा एकदा साहित्यिकांनी सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी सिध्द झाले पाहिजे असे प्रतिपादन डॉ.बा.आं.म.वि.संभाजीनगर चे मराठी अभ्यास मंडळ सदस्य प्रा.डॉ.शिवाजी हुसे यांनी केले. संत कबीर जयंतीनिमित्त एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित '२० वे राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलना'च्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. महिला किसान अधिकार मंच अध्यक्षा तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मनिषा तोकले (बीड) यांनी काव्य संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, युवक प्रदेश निमंत्रक इम्रान शेख, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगचा धोका लक्षात घेत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून दरवर्षी त्याचा वाढदिवस साजरा करावा असे आवाहन साहित्यिक अनंत कराड यांनी केले.

संत कबीर जयंतीनिमित्त शनिवार दि.२२ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत संपन्न झालेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलनात रसूल पठाण (उदगीर) यांनी 'बाप' व 'आश्रु' रचना सादर केल्या. एकता फाउंडेशन परभणी जिल्हाध्यक्ष बालसाहित्यिक पु.ना.बारडकर (सेलू) यांनी 'आई' ची महती सांगणारी कविता पेश करत श्रोत्यांची मने जिंकली. प्रा.संध्या महाजन (जळगाव) यांनी 'सुखद दुःख' व 'मायेची गोधडी' काव्य सादर केले. यशोदिप पब्लिकेशन, पुणे च्या प्रकाशिका रूपाली अवचरे यांनी 'बाईपणाची जात' ही कविता तर 'गस्त' ही गझल गाऊन रसिकांची वाहवा मिळवली. प्रा.जयकर गायकवाड (लातूर) यांनी 'मानवतेची धिंड' व 'उठ तरूणा जागा हो' या कविता पेश करत सर्वांना मंत्रमुग्ध केले. एकता फाउंडेशन परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर यांनी 'संत कबीर' व 'बाप' या प्रासंगिक रचना उपस्थितांसमोर सादर केल्या. मंगल वाघमारे यांनी 'रात्रीच्या गाढ अंधारात' तर वृषाली सोनवणे (संभाजीनगर) यांनी 'ओढ पावसाची' या कविता श्रोत्यांना ऐकवल्या. या संमेलनाचे सूत्रसंचालन कुलदीप चव्हाण (कोपरगाव) यांनी केले.

एकता फाउंडेशन मराठवाडा युवा आघाडी संघटक ह.भ.प.सुनील महाराज केकाण यांनी काव्य संमेलनाचे प्रस्ताविक तर एकता फाउंडेशन शेवगाव तालुका सल्लागार ड.प्रताप वाघुंब्रे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी राज्यभरातील निवडक कवी कवयित्रींसह एकता फाउंडेशनचे पदाधिकारी आणि सभासद ऑनलाईन पद्धतीने काव्य संमेलनास उपस्थित होते.

# सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विश्वविक्रमी नोंद झाल्याबद्दल डॉ.राजेश इंगोले यांचा गौरव

पत्रकार व कलावंतांचा पुढाकार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठी पत्रकार परिषद व अंबानगरी कलाकार कट्टा यांच्या वतीने सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये विश्वविक्रमी नोंद झाल्याबद्दल व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वा.रा.ती. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे होते.प्रमुख अतिथी म्हणून सोनूजी डगवाले डॉ. श्रीनिवास रेड्डी,प्रा.ईश्वर मुंडे,आदर्श शिक्षक एस.बी.सय्यद,तालुका वैद्यकीय अधिकारी बालासाहेब लोमटे आदी उपस्थित होते. या प्रसंगी सोनूजी डगवाले म्हणाले की, कलावंत पत्रकारांच्या पुढाकारातून एका डॉक्टरचा सत्कार ही बाब वेगळेपण दर्शविणारी आहे.




डॉ.रेड्डी म्हणाले की, इंडियन मेडिकल असोसिएशनचे काम करताना डॉक्टर मंडळी मध्येही डॉ.इंगोले यांनी नवचैतन्य निर्माण केले.

सत्काराला उत्तर देताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की,कोल्हापूरच्या कलावंत व रसिकांनी सिफा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी माझी निवड केली हे माझं भाग्य आहे मला जीवनात प्रेरणा देणारी माणसे मिळाली व अंबाजोगाईच्या मातीशी माझी नाळ जोडल्या गेली ती आजही वृद्धींगत आहे.

अध्यक्षीय समारोपात डॉ.धपाटे म्हणाले की, डॉ.इंगोले हे एक एनर्जीक रसायन असून त्यांनी कोरोना काळात केलेले कार्य हे अविस्मरणीय आहे.

या प्रसंगी आय एम ए म.राज्य सांस्कृतिक कार्यकारिणीत मध्यवर्ती सदस्य म्हणून नेत्ररोग तज्ञ डॉ. योगेश मुळे,बालरोगतज्ञ डॉ. विजय लाड व नेत्ररोगतज्ञ डॉ.प्रज्ञा किनगावकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलाकार कट्टाचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश बोरगावकर यांनी केले संचलन परमेश्वर गित्ते व उपस्थितांचे आभार दत्तात्रय अंबेकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बळीराम उपाडे, नाना गायकवाड, बालाजी शेरेकर,रोहिणी गायकवाड,अभय जोशी, शिवकुमार मोहेकर, महादेव माने,प्रशांत लाटकर,गजानन मुडेगावकर,ज्ञानेश मातेकर,व्यंकटेश जोशी,अशोक दळवे,मारुती जोगदंड,मुशीर बाबा, शेख फिरोज, बाळासाहेब फुलझळके यांनी परिश्रम घेतले.यावेळी म.प.परिषदेचे सदस्य,इतर संघटनाचे पदाधिकारी,कलावंत, महिला,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




आष्टी /प्रतिनिधी

मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने रविवार दि २३ जून २०२४ रोजी आपण करीत असलेल्या राष्ट्र विकासाच्या उन्नतीसाठी, (पत्रकारिता) या क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून आपणांस महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्कार - २०२४ आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा लोकमत व मराठवाडा साथी दैनिकाचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधवराव व सिने अभिनेत्री स्मिताताई भोसले/धुमाळ यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आरोग्य मित्र सुभाष गायकवाड, उद्योजिका तथा सामाजिक कार्यकर्त्या सगिताताई गुरूव, जिजाऊ ब्रिगेडच्या अहमदनगर जिल्हाध्यक्षा तथा जिजाऊ व्याख्यात्या अनिताताई काळे, देवानंद कांबळे, सेवा निवृत्त कर्नल जी पी लद्धा, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव सुरज भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

## मतदारसंघ पुनर्रचनेआधीची शेवटची विधानसभा

# महिनाभरापूर्वी खुंटा बळकट केलेल्यांची ताकद पणाला लागणार

सारीपाट / प्रशांत बाफना ८०५५४४०३८५

लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि त्याच्या आकडेमोडीत गुंतलेले आता बहुतांशजण विधानसभेसाठीची गणिते मांडू लागले आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच लढत होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नगर जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघात दोन्ही बाजूकडून आडाखे बांधले जाऊ लागले आहेत. दोन्ही बाजूने काही उमेदवार अंतिम असले तरी काही ठिकाणी बदल होण्याचे संकेत मिळत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपा- सेना या महायुतीला नरेटीव्ह म्हणजेच खोट्या कथनकाचा मोठा फटका बसल्याचा दावा त्यांच्याकडून केला जात आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीचे दोन्ही उमेदवार जिल्ह्यात विजयी झाल्याने त्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुवर्रचना झाल्यानंतर त्याची मुदत आता पुढच्या वर्षात संपत आहे. म्हणजेच आता होणारी ही निवडणूक शेवटची असणार! चार-पाच वर्षानंतर येणारी लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुका या नव्याने पुनर्रचना जाहीर होणार्या मतदारसंघानुसार असणार आहेत. लोकसभेत दोन जिंकल्याने महाविकास आघाडीत उत्साह जसा आहे तशीच उमेदवारांची जत्रा देखील आहे. दुसरीकडे सपाटून मार खालेल्या महायुतीतील भाजपा- सेना- राष्ट्रवादीतील संभाव्य उमेदवारांनी सावधगिरी बाळगण्यास आतापासूनच प्रारंभ केल्याचे दिसते. विशषेत: भाजपाच्या चिन्हावर लढावे की नाही इथपासूनच काहींच्या समर्थकांनी भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. एकूणच प्राप्त परिस्थितीत नगरमधील बारा जागांबाबत काय होऊ शकते याचा घेतलेला हा आढावा

नगर शहरात जगताप यांच्या विरोधात कोण?

लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी नगरचा निकाल फिरवला. नगर शहरातील मुस्लिम बहुलभागातील मतदान केंद्रात विखेंना एक आकडी तर लंके यांना तीन-चार आकडी मते मिळाली. आपण ठरवू तो उमेदवार आपण विजयी करू शकतो ही भावना यानिमित्ताने मुस्लिम मतदारांमध्ये वाढीस लागलीय आणि ते स्वाभाविक आहे. दुसरीकडे आ. संग्राम जगताप यांच्यासमोर पर्याय म्हणून आजतरी आश्वासक चेहरा दिसत नाही. महाविकास आघाडीतील काँग्रेसकडे किरण काळे, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून अभिषेक कळमकर आणि शिवसेना ठाकरे गटाकडून माजी महापौर भगवान फुलसौंदर, शहर प्रमुख संभाजी कदम, विक्रम राठोड ही नावे चर्चेत आहेत. महायुती असली तरी भाजपाकडून माजी नगराध्यक्ष वसंत लोढा, शहर जिल्हाध्यक्ष अॅड. अभय आगरकर, बाबासाहेब वाकळे, भैय्या गंधे ही नावे चर्चेत आहेत. याशिवाय एकनाथ शिंदे गटाकडून अनिल शिंदे, दिलीप सातपुते ही नावे चर्चेत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी अशी लढत झाल्यास महायुतीच्या आ. संग्राम जगताप यांच्यासमोर आजतरी महाविकास आघाडीकडे तुल्यबळ असा चेहरा दिसून येत नाही. मात्र, सक्षम पर्याय म्हणून तिसरेच नाव समोर येण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. काँग्रेस नेते आ. बाळासाहेब थोरात यांच्याकडून नगर शहरात आतापासूनच लक्ष घालण्यास प्रारंभ झाला असल्याने त्यांची भूमिकाही निर्णायक ठरणार आहे.

मोनिकाताईंच्या विरोधात ढाकणे की चंद्रशेखर घुले?

शेवगाव- पाथर्डी या विधानसभा मतदारसंघात सलग दोनवेळा भाजपाच्या मोनिकाताई राजळे या निवडून आल्या आहेत. लोकसभेतील आकडेवारी पाहता यावेळी राजळे यांच्यासमोर मोठे आव्हान असणार आहे. अर्थात, त्यातही चंद्रशेखर घुले हे काय निर्णय घेतात यावर बरेच काही अवलंबून असणार आहे. मात्र, यावेळी कोणत्याही परिस्थितीत आरपारची लढाई करण्याची भूमिका प्रतापराव ढाकणे यांनी घेतलेली दिसतेय. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने प्रत्येक गाव- वाडी- वस्तीवर जात आपल्या स्वत:ची निवडणूक असल्यागत ढाकणे यांनी मतदारसंघ पिंजला. नव्या- जुन्यांचा मेळ घालत त्यांनी तगडा संच उभा केल्याचे कालच्या लोकसभेत तरी जाणवले. सौभाग्यवती प्रभावती आणि कारखान्याचे अध्यक्ष असलेले चिरंजीव यांनी गेल्या काही वर्षात मतदारसंघ पिंजला आहे. एकणूच जातीय समिकरणे या मतदारसंघात कायमच निर्णायक ठरत आली आहेत. याशिवाय हर्षदाताई काकडे यांच्या नावाचीही चर्चा आहे. त्यामुळेच येथील लढाई यावेळी यापूर्वीच्या निवडणुकांपेक्षा वेगळी आणि निर्णायक झाल्याचे दिसून आल्यास आश्चर्य वाटू नये.

नेवाशात शंकरराव गडाखच; चिन्ह कोणते हाच चर्चेचा विषय!

नेवासा मतदारसंघात आजतरी सबकुछ शंकरराव गडाख हेच आहेत. संयमी आणि शांत स्वभाव आणि जोडीने मंत्रीपदाच्या माध्यमातून केलेली कामे ही त्यांची आता यावेळच्या जमेची बाजू आहे. मागीलवेळी बॅट चिन्हावर थेट विधानसभेचा षटकार ठोकल्यानंतर शिवबंधन हाती बांधत मंत्रीपद मिळविणारे शंकररा


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT